**राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका राखीव प्रवर्गातुन लढविणा-या उमेदवारांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास अपात्र करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ग्रापनि-२०१४/ प्र.क्र.१५९/पं.रा.-२**

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,

फोर्ट, मुंबई- ४०० ००१

तारीख: ४ ऑगस्ट २०१६.

**संदर्भ:-**

१. राज्य निवडणुक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१/ कार्यासन - ५ दिनांक ४ फेब्रुवारी २०१६.

२. या विभागाचे समक्रमांक व दिनांक १८ फेब्रुवारी २०१६ चे पत्र.

**परीपत्रक:-**

राज्य विधिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१/२०१६ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०/२०१६ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारीत तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राखीव प्रवर्गातुन लढविणा-या उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र नाम निर्देशनाच्यावेळी सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत प्राप्त होत नसल्याने तसेच जात पडताळणी समित्यांवर कामाचा असलेला अतिरिक्त ताण विचारात घेऊन व राखीव प्रवर्गातुन निवडणुक

लढविणारे उमेदवार निवडणुकांपासुन वंचित राहु नये म्हणुन शासनाने वेळोवेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२-अ, ४२(६)(अ), ६७(७-अ) मध्ये व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०-१अ, ३०-१अ मध्ये सुधारणा करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास निवडुन आल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांची मुदत वाढ दिलेली होती. सदर मुदतवाढ नव्याने देण्यात आली असुन ती दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत होणा-या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी लागु राहणार आहे.

२. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी- जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद यांना नव्याने करण्यात आलेल्या तरतुदींविषयी अवगत करण्यात आलेले आहे.

३. उपरोक्त संदर्भात राज्य निवडणुक आयोगाने त्यांच्या संदर्भ क्रमांक (१) येथील दिनांक ४ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रान्वये अधिनियमातील उपरोक्त तरतुद स्पष्ट असली तरी निवडुन आलेल्या सदस्याने सहा महिन्याच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भुतलक्षी प्रभावाने रद्दबातल झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश कोणत्या अधिका-याने काढावयाचे याबाबत अधिनियमात स्पष्ट तरतुद नसल्याचे नमूद केले आहे. त्यानुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयासाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने सहा महिन्याच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भुतलक्षी प्रभावाने रद्दबातल झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश कोणत्या अधिका-याने काढावयाचे याबाबत शासनाने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे सुचित केले आहे.

४. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेल्या जागेवर निवडुन आलेल्या सदस्यांने सहा महिन्याच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न

केल्यास त्याची निवड भुतलक्षी प्रभावाने रद्दबातल झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश जिल्हाधिकारी यांच्याकडुन निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८०३१७२३५९७८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: CN = Sanjay R Bankar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Date: 2016.08.04 13:14:43 +05'30'

**संजय बनकर**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई.
२. सर्व सन्मानीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्या.
३. राज्यपालांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्य निवडणुक आयोग यांचे कार्यालय,
८. मा.मुख्यसचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी,
११. विभागीय आयुक्त, सर्व.
१२. जिल्हाधिकारी, सर्व.

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व.
१४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), सर्व.
१५. सर्व मंत्रालयीन विभाग,
१६. विभागातील सर्व सहसचिव, उपसचिव,
१७. विभागातील सर्व कार्यासने,
१८. निवडनस्ती ( पं.रा.-२).